**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९३०    दि. ०७/०९/२०१९**

# प्रेसनोट

## जमिन खरेदी विक्रीच्या व्यवसायात वैमनस्य झाल्याने पिस्टल बाळगना-या सराईत गुन्हेगाराकडुन युनिट-१ गुन्हे शाखेने दोन पिस्टल व राऊंड केले हस्तगत

---

दिंनाक ३०/०८/२०१९ रोजी युनिट-१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील स्टाफ पुणे शहराचे हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना मिळालेल्या बातमी वरुन जागेचे व्यवहार करणारा पुणे शहराच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार सुजित मिनानाथ देवकुळे, वय ३२ वर्ष, रा स नं ६४९, विघ्नहर्तानगर बिबवेवाडी पुणे यास १ देशी बनावटीचे पिस्टल, २ जिवंत काडतुसे व १ रॅम्बो चाकू पकडण्यात आले होते. सदर आरोपीवर बिबवेवाडी पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं.२६३/२०१९ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), ४(२५), व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरच्या गुन्हयात यातील आरोपीची मा.जोंधळे सो, कोर्ट नं.४ यांनी आज पावेतो पोलीस कस्टडीची रिमांड दिली होती.

पोलीस कस्टडी दरम्यान यातील आरोपीकडे तपास करता सदरचे पिस्टल हे त्याने सतना येथून इसम नामे केशव त्रिपाठी याचेकडुन विकत घेतल्याचे सांगितल्याने आरोपीसह युनिट-१ कडील विशेष पथक हे रामपुर, वाघेलान, जि.सतना, मध्यप्रदेश येथे रवाना करुन केशव त्रिपाठी याचा शोध घेतला परंतु तो मिळून आला नाही.

यातील आरोपी सुजित देवकुळे याचेकडे पोलीस कस्टडी दरम्यान त्यास विश्वासात घेऊन बारकाईने तपास केला सता त्याने लपवून ठेवलेले आणखी एक गावठी बनावटीचे पिस्टल व १ जिवंत काडतुस असा कि रु.३५,२००/- चा माल हस्तगत करण्यात आला आहे. अशा प्रकारे सदरच्या आरोपीकडुन एकुण २ गावठी बनावटीची पिस्टल व ३ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.अशोक मोराळ सो, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.बच्चन सिंह सो, तसेच सहा. पोलीस आयुक्त, श्री.शिवाजी पवार सो यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री.अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक उत्तम बुदगुडे, हनुमंत शिंदे, पोलीस कर्मचारी, अमोल पवार, अजय थोरात, प्रकाश लोखंडे, गजानन माळवदकर, अशोक माने, वैभव स्वामी, तुषार माळवदकर, योगेश जगताप, बाबा चव्हाण, हनिफ शेख, सुभाष पिंगळे, इरफान मोमिन यांनी केली आहे. यातील आरोपीची मा.जोंधळे सो, कोर्ट नं.४ यांनी आणखी २ दिवस पोलीस कस्टडीची रिमांड दिली आहे.